
Shivaji College, Hingoli • Dist. Hingoli

ISBN : 978-93-83672-76-9



# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे : अनुभवाचे विद्यापीठ

संपादक

डॉ. रमेश लांडगे

डॉ. सविता कोठावळे

डॉ. कृतिका खंदारे

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-93-83672-76-9

# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे : अनुभवाचे विद्यापीठ

संपादक

डॉ. रमेश लांडगे
डॉ. सविता कोठावळे
डॉ. कृतिका खंदारे

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shaurya Publication, Latur

Scanned with OKEN

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-93-83672-76-9

# अनुक्रमणिका


१. जनतेसाठी जगणारा आणि लिहिणारा लेखक : अण्णा भाऊ साठे ११

**डॉ. मारोती द.कसाब**

२. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि विचारप्रभाव २०

**प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**

३. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचार २८

**प्रा. डॉ. संजय दा. शिंदे**

४. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव ३४

**प्रा.सौ.डॉ.वनमाला लोंढे**

५. अण्णाभाऊ साठे :व्यक्ती आणि वाङ्मय ३९

**प्रा.डॉ. सूर्यकांत सांभाळकर, प्रा. डॉ. सुहास मोराळे**

६. लोकशाहीर ते भिमशाहीर : अणाभाऊ साठे ४४

**प्रा. किरण चक्रे**

७. अण्णाभाऊ साठे यांची शाहिरी व वगनाट्य ४७

**काळबांडे सविता साहेबराव**

८. अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यातील सामाजिक विचारांचा अभ्यास ५४

**डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव**

९. आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मार्क्सवादी विचार - एक अध्ययन ५७

**प्रा. डॉ. विलास आघाव**

१०. अण्णाभाऊ साठे आणि त्यांचे साहित्य ६३

**प्रा.डॉ.तांदळे सुरेंद्र एस.**

११. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाज वास्तव ६५

**प्रा. डॉ. जी.पी. बोडखे**

१२. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार ६६

**प्रा. डॉ. ढाले एस.यू.**

१३. जागतिक तत्ववेत्ते अण्णाभाऊ साठे ७५

**दत्ता कसबे**

१४. अण्णा भाऊ साठे यांचे कार्य, साहित्य आणि चळवळ

**प्रा. डॉ. डी.एम.कदम**


Principal
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

ISBN : 978-93-83672-76-9

Shivaji College Hingoli Dist Hingoli

१२.

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार

प्रा. डॉ. ढाले एस.यू.
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली*

**प्रस्तावना:**

१९२० च्या नंतरची साहित्य निर्मिती प्रामुख्याने सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समानता प्रस्थापित व्हावी, मानवाचे मानवाकडून होणारे शोषण नष्ट व्हावे, देशात समाजवाद अंमलात यावा या मानवतावादी दृष्टीकोनातून केली गेली. अशा प्रकारच्या समग्र विचारांची मांडणी करण्यामध्ये भारतीय साहित्य चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. या अनुषंगाने अण्णाभाऊ साठेंचा साहित्याबद्दलचा दृष्टीकोन भारतातील सामाजिक व राजकीय क्रांतीचा आहे. त्यांच्या साहित्यातून गरीब, श्रमिक व उपेक्षितांच्या अंतरंगाचे प्रतिबिंब व शोषणाधिष्ठित व्यवस्थेविरूध्दचा सामाजिक आणि राजकीय विद्रोह पावलोपावली प्रकट होतो. सामाजिकदृष्टया उपेक्षित, दलित आणि पिडीतांच्या व्यथा, वेदनांना साहित्यासारख्या दुधारी तलवारीच्या माध्यमातून मुखर करणारी अण्णाभाऊ साठे यांची कामगिरी भारतीय समाज जीवनाला बदलणारी आहे. त्यांच्या साहित्यातून शास्त्रीय समाजवादाला अभिप्रेत असलेल्या वर्गीय दृष्टीकोनातून साम्यवादी क्रांतीची प्रेरणा मिळते. जगातील अनेक राजकीय विचारवंतानी सामाजिक आणि राजकीय समतेचा पुरस्कार केलेला आहे. कार्लमार्क्स, लेनीन, माओ या विचारवंतानी सामाजिक आत्मसन्मानाबरोबरच उत्पादनाच्या साधनांचे समान वितरण व्हावे या सैध्दांतिक तत्वांची मांडणी केली व मार्क्सचा हा शास्त्रीय समाजवाद अण्णाभाऊंच्या साहित्यातून दृष्टीगोचर होतो. अण्णाभाऊ साठेंचे साहित्य मानवी जीवनाच्या संपूर्ण पैलूवर प्रकाश टाकणारे आहे तसेच त्यांच्या साहित्यातून क्रांतिसन्मुख व मुल्यदर्शी तत्वाचे राजकीय तत्वज्ञानही व्यक्त झालेले आहे.

**शोधनिबंध लेखनाचा उद्देश**

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार या विषयावरील शोधनिबंध लेखनाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

१) अण्णाभाऊच्या साहित्यातील राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

२) अण्णाभाऊंच्या साहित्यामधील सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.

३) अण्णाभाऊंच्या साहित्यामधील आर्थिक विचार ा अभ्यास करणे.



PRINCIPAL
Shivaji College

ISBN : 978-93-83672-76-9

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामधील विचार

अण्णाभाऊ साठेंचे समग्र साहित्य मानवी जीवनाच्या सिध्दांताशी अनुभवसिध्द पडताळणी आहे. त्यांचे साहित्य कल्पनेच्या भराऱ्या मारणारे किंवा मनाचे रंजन करणारे नसून विषमतामुलक मानवी जिवनातील संघर्षाचे, दु:ख, दारिद्रय, दैन्य, भुकबळी, असुरक्षितता या संपूर्ण विकृत जीवन पध्दतीचा चित्रालेख आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्या, लोकनाट्य, पोवाडे, लावणीच्या माध्यमातून दिसनू येणारा दृष्टीकोन राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक लोकशिक्षणाची भूमिका पुढे घेऊन जाणारा आहे.

स्वातंत्र्य चळवळीत अण्णाभाऊ साठे यांनी भाग घेतला होता. १९४२ च्या चलेजाव आंदोलनात ते सहभागी झाले असतांना त्यांच्यावर पकड वॉरंट काढण्यात आले होते. त्याचबरोबर अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर यांनी उभा महाराष्ट्र पेटून उठविला. अण्णाभाऊ साहित्य लेखनाबरोबरच स्वातंत्र्य आंदोलनातही तितकेच सक्रीय होते. अण्णाभाऊंनी त्यांच्या साहित्यात मानवी जीवनाच्या अनेक पदरी विदारक विषमतेचे स्वानुभवातून चित्रण केले आहे. भांडवलशाही व्यवस्थेचे समुळ उच्चाटन व समाजवादी राज्यव्यवस्थेच्या मुलभूत सभ्यता व संस्कृती निर्मितीचा वेध घेतला आहे. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिकांच्या जीवनातील अतिभयंकर संघर्ष जिवनानुभवातून मांडला आहे. साम्यवादी सिध्दांताच्या दृष्टीकोनातून त्यांनी कार्ल मार्क्सप्रमाणेच वर्गजाणीव प्रगल्भ करणारा वर्ग संघर्ष उभा केला व त्यातून भांडवलशाहीतील अतिउच्च व्यवस्थेला कडाडून विरोध केला. त्यांच्या कथा व कादंबऱ्यामध्ये भारतीय संदर्भातील सामाजिक, सांस्कृतिक मुल्यांबरोबरच जातीविहीन, वर्गविहीन समाजरचना व आर्थिक विषमतेला तिलांजली देवून राजकीय, आर्थिक व सामाजिक समानता व बंधुभाव प्रवर्धीत करण्याची तळमळ दिसून येते. वेदना, विद्रोह, नकार या जीवनमुल्यांचे विराट दर्शन त्यांच्या साहित्यातून आढळते. ज्या शोषीत, दलित, श्रमिक, कष्टकरी वर्गाला तेथील भांडवली संस्कृतीने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला त्यांना अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यात समाजक्रांतीचे नायक बनविले व अशी गगणभेदी घोषणा केली की, "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दीन दलित कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे." या विधानातून अण्णाभाऊ साठेंनी श्रमशक्तीची ताकद व विश्वनिर्मितीचा मुलाधार कामगारच आहे हे मार्क्सचे तत्व दाखवून दिले आहे.

अण्णाभाऊंचे वाङ्मय म्हणजे जनतेचे वाङ्मय असे समिकरण तयार झाले. मानवी जीवनाला शोषणाविरोधी तत्वनिष्ठेची जाणीव असली पाहिजे. शोषीतांच्या आयुष्याला क्रांतीची, प्रबोधनाची ज्वलंत चेतना पाहिजे म्हणजे हेच तत्व निश्चित व पथदर्शक असते.

PRINCIPAL ... College ... Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-93-83672-76-9

पोटासाठी जमीनदार–भांडवलदारांचा अन्याय अत्याचार सहन करणारा समाज त्यांनी भोगल्या कादंबरीत रेखाटला आहे. अण्णाभाऊंनी केवळ दलितांचे जीवन रेखाटले नाही तर [illegible] अशा बहुजनाचेही जीवन चित्रण रेखाटले आहे. त्यांच्या लेखी जो जो अन्याय, अत्याचार व शोषणाने पिडला गेला तो दलीत. अशी त्यांची दलीत या शब्दाची व्यापकता होती. म्हणून या संदर्भात कवीश्रेष्ठ नारायण सूर्वे म्हणतात, "अण्णाभाऊ केवळ दलित जनतेचेच लेखक नव्हते तर ते जगातील सर्व अन्यायाविरूध्द लढणारे समग्र मानवजातीचे लेखक होते, शाहीर होते. अण्णाभाऊ एकाच वेळेला वर्णव्यवस्था आणि भांडवली व्यवस्थेच्या विरूध्द लढणारे ज्वलंत लेखक होते. माकडीचा माळ ही कादंबरी दारिद्र्याच्या दयनियतेचे विश्लेषणात्मक चित्रण आहे. फकीरा ही कादंबरी अन्यायी इंग्रज राज्यव्यवस्था व जुलमी कायदा या विरूध्द पुकारलेल्या राजद्रोहात्मक क्रांतीच्या बंडाची कैफीयत आहे.

अण्णाभाऊ साठे यांनी या देशातील सर्वसामान्य माणसाला शोषणाविरूध्द पेटून उठण्याचे सामाजिक आणि राजकीय चळवळीचे क्रांतीकारी शस्त्र दिले. भारतामध्ये अनेक जातीधर्म पंथाचे लोक एकत्र राहतात. त्यांची एकता भंग करणाऱ्या अपप्रवृत्तींचा नायनाट करून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारलेली नवी समाजरचना अण्णाभाऊंना निर्माण करायची होती,ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित होऊ शकेल. म्हणून अण्णाभाऊंच्या कथा या सामाजिक मुल्ये मापदंडाचे निर्धारक ठरतात. वैचारीक स्वातंत्र्य, उच्च चारित्र्य, बुध्दीवादी दृष्टीकोनावर आधारीत संशोधक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन, पवित्र सांस्कृतिक मुल्य त्यांच्या साहित्यातून व्यक्त होतात. अखिल मानवजात ही स्वतंत्र व समान आहे हा सिध्दांत त्यातून अविष्कृत होतो. अण्णाभाऊंचे साहित्यमुल्य व्यक्तीची प्रतिष्ठा प्रदर्शित करणारे आहे. त्यांनी आपल्या अध्ययनात विरोधविकास तत्व स्विकृत केलेले दिसून येते. अण्णाभाऊंनी कार्ल मार्क्स, लेनीन, माओ, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रशियन राज्यक्रांतीचा इतिहास अशा राजकीय आणि सामाजिक चळवळीला पोषक असलेल्या क्रांतीकारकांच्या, प्रबोधनकारांचा व ग्रंथांचा अभ्यास केला. त्यांच्या साहित्य लिखानाचा मुलभूत आधारस्तंभ समाजवादी, सामाजिक, राजकीय व आर्थिक संरचनेची निर्मिती हा असून त्यांच्या साहित्यातून समाजवादी क्रांतीचा विचार पुढे येत होता. १९१७ मध्ये रशियन राज्यक्रांती झाली. त्या क्रांतीचे परिणाम जागतिक पातळीवर झाले. भांडवलशाहीप्रणीत राजसत्तेला हादरे बसू लागले. रशियातील शेतकरी, कष्टकरी गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाला. या रशियाच्या संघर्षमय क्रांतीचा अण्णाभाऊंच्या साहित्यात ज्वलंत अविष्कार होतांना दिसतो व त्या इतिहासाने अण्णाभाऊंच्या मनावर प्रचंड पकड निर्माण केली.

Shivaji College
Hingoli Dist. Hingoli

ISBN : 978-93-83672-76-9

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. जगातील अनेक महान राज्यक्रांत्या लेखक, कलावंत व साहित्यिकांच्या अविष्कारातून जन्म घेतल्या आहेत. सुप्रजाप्रबोधनासाठी भारतातील अनेक समाजसुधारकांनी साहित्याचा उपयोग समाजकल्याणासाठी केला म्हणून साहित्यिक लेखन हे राजकीय सामाजिकरणाचे एक गतीशिल अभिकरण म्हणून कार्य करते. त्या माध्यमातून समाजाला योग्य दिग्दर्शन केले जाते. हे तत्व ओळखून अण्णाभाऊंनी क्रांतीसाठी वैचारीक प्रबोधनाचा अवलंब केला. केवळ समाजसत्तावादी व्यवस्थेतच मानवी जीवनात आर्थिक व राजकीय स्थैर्य एका समानपातळीवर असू शकते असे त्यांचे प्रबळ ग्रहीतकृत्य होते. अण्णाभाऊंचे लेखन हे व्यवस्था सुधारक नसून क्रांतीकारक स्वरूपाचे आहे. कामगारांच्या अधिराज्य व्यवस्थेत नागरीकांना त्यांच्या स्वातंत्र्याची व सुरक्षिततेची हमी प्राप्त होत असते. ही मार्क्सवादी तत्वप्रणाली अण्णाभाऊंनी त्यांच्या साहित्यात मांडली.

अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटय, पोवाडे, गीते, मुंबईची लावणी यामधून व्दंव्दात्मक भौतिकवादी अध्ययन पध्दीचा अवलंब केलेला आहे. भांडवलशाही व्यवस्थेत न्यायाची अपेक्षा मुळीच करता येत नाही. राज्यव्यवस्था भांडवलदार व धनीक लोकांना वाचविण्यासाठी काळे कायदे पुढे करते. हे अण्णाभाऊंच्या बेकायदेशिर या लोकनाटयातून दिसून येते. श्रमिक हा संपत्तीचा मालक असायला पाहिजे. परंतु भांडवलशाही राज्यात मालक हा श्रमिकाला गुलाम बनवितो असे प्रतिपादन अण्णाभाऊंनी केले आहे. आजही देश स्वतंत्र असून सुध्दा प्रचंड विषमता, शोषण, असुरक्षा असल्याचे दिसून येते. म्हणून अण्णाभाऊ म्हणतात,या संबंध व्यवस्थेविरूध्द क्रांतीव्दारे समाजवादी राज्यव्यवस्था स्थापन करावी, भारत राष्ट्रात पूर्णत: लोकशाही जनतेचे राज्य स्थापन करून त्याव्दारे समाजवादाची निर्मीती करावी असे अण्णाभाऊ प्रतिपादन करतात.

अण्णाभाऊंनी १९४२ ते १९५० या कालखंडात लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून लोकनाटय, लावणी, पोवाडे यासारख्या रचना जनतेसमोर मांडून अन्याय, अत्याचार, विषमता, दैन्य, दारिद्रय, भ्रष्टाचार, महागाई, दुष्काळ, महिलांचे शोषण यासारख्या विषयावर लोकप्रबोधन करून सर्वसामान्य माणसांना अन्यायाविरूध्द पेटून उठवण्याचे कार्य करून क्रांतीचे रणशिंग फुंकले व सर्व श्रमिक वर्गानी एकजूट केली पाहिजे असे त्यांनी श्रमिकांना आवाहन केले. वर्गयुध्दाचा निर्धार करून कामगाराचा इतिहास आपल्या लोकनाटय, पोवाडे व लावण्यातील वर्गीय जाणीवांच्या विश्लेषक दृष्टीने श्रमिक वर्गापुढे ठेवून त्यांना शोषणाविरूध्द विद्रोहात्मक क्रांतीची प्रेरणा दिली.

सांप्रत भारतीय समाजव्यवस्थेत १९९१ च्या नंतर भारताच्या समाजवादाची जागा खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाने घेतली. नवसाम्राज्यवादी आर्थिक व्यवस्था स्विकारल्यामुळे कामगार, कष्टकरी, शेतकरी, दलित, आदिवासी यांच्या जीवनाची ससेहोलपट होतांना दिसते आहे. आणि त्यातून पुन्हा भारतीय समाज [illegible]

PRINCIPAL
Hingoli

Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-93-83672-76-9

असल्याचे दिसून येत आहे. देशात भ्रष्टाचार, दारीद्रय, महिलांचे वाढते शोषण, महागाई, सीमावाद, दहशतवाद, प्रादेशिकवाद यासारखे प्रश्न आजही स्वातंत्र्यपूर्व काळाइतकेच भयंकर आहेत. या संपूर्ण आव्हानांना सामोरे जावून भ्रष्टव्यवस्था मोडीत काढण्याचे व शोषणावर आधारीत व्यवस्थेला मुठमाती देवून समाजसत्तावादी राज्य निर्माण करण्यासाठी अण्णाभाऊ साठेनी त्यांच्या साहित्यात वर्गसंघर्षाची मांडणी केली आहे. कामगारांच्या राज्याचा सिध्दांत मांडला आहे, जातीविहीन व वर्गविहीन समाज रचनेची तत्वे प्रतिपादीत केली आहेत. म्हणून भारतीय समाजाचे प्रबोधन करून जनतेला पूर्ण लोकशाही क्रांतीची आवश्यकता विषद केलेली आहे. ही पूर्णलोकशाही क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य विचारात दिसून येते. म्हणून अण्णाभाऊंच्या साहित्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय विचारांची प्रासंगिकता वर्तमान भारतीय समाजाला आहे.

**निष्कर्ष:**

१) अण्णाभाऊ साठे यांच्या राजकीय विचारांमध्ये सर्वसामान्य उपेक्षित, वंचित वर्गाचा विचार केला आहे. कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचाराचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर प्रकर्षाने दिसून येते.

२) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामधून तत्कालीन सामाजिक व्यवस्थेत सामाजिक आहे.

३) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामधून शोषित, दलित, कष्टकरी वर्गाच्या श्रमशक्तीची ताकद व
विश्वनिर्मीतीचा मुलाधार स्पष्ट करून आर्थिक क्रांतीचा विचार मांडला आहे.

४) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेचा विचार प्रवर्धित करण्याची शक्ती आहे.

**महत्व:**

अण्णाभाऊ साठे यांनी भारतीय समाजव्यवस्थेतील विषम व्यवस्थेवर प्रहार केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले आहेत. या सर्वावर अणाभाऊ साठे यांचे साहित्य महत्वाचा उपाय आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कष्टकरी वर्ग होरपळला जात आहे. जातीव्यवस्था नष्ट होण्याऐवजी प्रखर होऊन संघर्ष करीत आहे. या परिस्थितीत संविधानाव्दारे सांगितलेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय ही मुल्ये टिकवणे महत्वाचे आहे, साहित्य व कलेच्या माध्यमातून, लोकप्रबोधनातून समाज शिक्षण देणे गरजेचे आहे. हे सामर्थ्य अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आणि कार्यात दिसून येते. अण्णाभाऊंनी लिहीलेली लोकनाटय, पोवाडे, कथा, कादंबऱ्या, लावणी इत्यादीच्या माध्यमातून देशात सामाजिक समता, राजकीय समता



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli
Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-93-83672-76-9

आणि आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी वर्ग–वर्ण विरहीत समानतेचे तत्वज्ञान मांडले आहे.

संदर्भसूची:


१) काचोळे, डॉ. दा.धो. (२०१०), सामाजिक संशोधन पध्दती.

२) जवळगेकर, डॉ. शिवाजी. (संपादक), सामाजिक संशोधन पध्दती, जननायक : अण्णाभाऊ साठे.

३) वानखेडे चंद्रकांत (संकलन), अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलने माणूस जागा व्हावा मधून लोकजागर, अस्मिता प्रकाशन, नागपुर.

४) कोरडे, बजरंग, (२००१), भारतीय साहित्याचे निर्माते, अण्णाभाऊ साठे साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

५) कांबळे, बळीराम, काबंळे, नारायण व इतर,कॉ. अण्णाभाऊ साठे एक चिंतन.

६) गुरव, बाबुराव. (२०१०), अण्णाभाऊ साठे आणि साहित्य विवेचन, लोकवाड्.मय गृह मुंबई, चौथी आवृती.

७) गादेकर, डॉ. माधव, (२००१). अण्णाभाऊ साठे साहित्य मुल्यमापन, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर, लोकावृत्ती प्रथमावृत्ती.


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner